# महाराष्ट्र शासन

# औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

कामगार भवन- ५ वा मजला, ई-ब्लॉक, सी-२०, रिझर्व्ह बँकेच्या समोर, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई -४०० ०५१ दूरध्वनी क्र. २६५७२५०४/०९/२२/५८, फॅक्स नं. २६५७२४७४,
ईमेल - dirdish.mum-mh@gov.in

माहितीचा अधिकार

**अति महित्वाचे**

क्र. संऔसुवआ/निरीक्षण / ५८४-९९ /७अ,
दिनांक :— 11 JAN 2019

परिपत्रक क्र.: ०४/२०१९

विषय :- कारखान्यांच्या निरीक्षणबाबत.

सप्टेंबर 2017 पासून कारखान्यांचे निरीक्षण केंद्रिय निरीक्षण प्रणालीमार्फत (CIS) ऑन लाइन झालेले आहे. या प्रणालीमार्फत आपणांस महिन्याभराची निरीक्षणाची यादी पाठविण्यात येते. परंतु असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच अधिकाऱ्यांची त्या त्या महिन्यातील निरीक्षणे पूर्ण झालेली नाहीत, त्यामुळे निरीक्षण न झालेल्या कारखान्यांचे नाव आपणाकडेच प्रलंबित राहते व ते नाव पुढील यादीत येत नाही, त्यामुळे आपण केलेल्या निरीक्षणाची टक्केवारी कमी होते.

तरी सर्व उप संचालकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, सप्टेंबर 2017 ते डिसेंबर 2018 या कालावधीत आपणांस प्राप्त झालेल्या निरीक्षणाच्या यादीतील, निरीक्षण न झालेल्या कारखान्यांसमोर निरीक्षण न झाल्याबाबतची कारणे (उदा. कार्यालयीन / न्यायालयीन उपस्थिती, मंत्रालय / कलेक्टर मिटींग) नमूद करुन ती यादी पुन्हा केंद्रिय निरीक्षण प्रणालीस सादर करावी, म्हणजे त्या कारखान्यांचे नाव पुढील महिन्याच्या निरीक्षणाच्या यादीत नमूद केले जाईल. अशा पुन्हा नावे आलेल्या कारखान्यांचे निरीक्षण प्राधान्याने करण्यात यावे.

(सु.प्र. राठोड)
प्रभारी संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

1) सर्व उप संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
मुंबई / नागपूर / पुणे-३ /
ठाणे / पालघर / कल्याण / रायगड / नाशिक /
पुणे-१ / पुणे-२ / कोल्हापूर / औरंगाबाद / अकोला

2) सांख्यिकी शाखा.